REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 9 | JUNE - 2019

# गोंदिया जिल्हयातील असंघटीत भात गिरणी कामगारांच्या आर्थिक समस्यांचे अध्ययन

डॉ. राजेश चांडक
एस. एस. जैस्वाल कॉलेज, अर्जुनी मोरगाव,
जिल्हा गोंदिया.

**सारांश**



प्रस्तुत अध्ययनातून प्राप्त परिणामांवरून वरील बाबींची माहिती उघडकीस येऊन या परिणामांचा उपयोग रोजंदारी तत्तवावर काम करणारे असंघटीत भात गिरणी कामगाराकरिता कल्याणकारी उपाययोजना आखण्यात होऊ शकेल. त्याचप्रमाणे मालक किंवा व्यावसायिकांचे लक्ष असंघटीत भात गिरणी कामगांराच्या समस्यांकडे वेधून घेता येऊ शकेल. तसेच त्यांच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा अंदाज येऊन त्यात कशा प्रकारे सुधारणा करता येऊ शकेल व त्यातील कोणते घटक भात गिरणी कामगांराच्या सर्वांगिण विकासात महत्तवपूर्ण राहतील याचा आढावा घेता येईल. कौटुंबिक जीवनात त्यांना येणाऱ्या समस्या व यावर प्रभाव करणारे विविध घटक याची माहिती प्राप्त होऊन सामाजिक कल्याण प्रक्रियेत या माहितीचा उपयोग करून घेता येईल. याच अनूषंगाने संशोधनकर्त्याने खालील विषय संशोधना करिता निवडण्याचे ठरविल आहे.

## प्रस्तावना

आपल्या देशात 'असंघटित कामगार' हा व्यापकार्थी शब्द वेगवेगळया क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्री-पुरूष कष्टकऱ्यांच्या संदर्भात वापरला जातो. पापड लाटून अथवा बिडया वळून पोट भरण्याचे 'घरस्थित' (होमबेस्ड) काम असेल किंवा ठेल्यावर, रस्त्यावर भाजीविक्रीचा स्वयंरोजगार किंवा छोटया घरगुती उद्योगांमधला कामगार तसेच शेतमजूर, बांधकाम मजूर, घराघरांतून धुणे-भांडी करणाऱ्या घरकामगार आणि अनेक इतर किरकोळ मजुरी करणारे सर्वच 'असंघटित' आहेत. 'संघटित' क्षेत्रात काम करणाऱ्या इतर कामगारांप्रमाणे भारतातील कामगारवर्गाने प्रंचड लढयातून मिळवलेला किमान वेतन कायदा, फॅक्टरी कायदा इत्यादी कामगार कायदे किंवा कायद्याने बहाल केलेल्या मातृत्व लाभांश, भविष्य निर्वाहनिधी, ग्रॅजुईटी इत्यादी कल्याणकारी योजनांचा त्यांना फायदा मिळत नाही.

'असंघटित' हा शब्द अनेक वेळा 'अनौपचारिक (इनफॉरमल) शब्दाला समांतर पद्धतीने वापरला जातो. 'अनौपचारिक' अशा उद्योगधंद्याना संबोधण्यासाठी वापरला जातो. जे कोणत्याही प्रकारच्या प्रचलित औद्योगिक कायद्यांच्या चौकटीत (उदाहरणार्थ, कंपनी कायदा) काम करीत नाहीत. हे खरे आहे की, एखाद्या 'अनौपचारिक' उद्योगात 'असंघटित'/'अनौपचारिक' कामगार काम करीत असणार, परंतु आपण हे विसरता कामा नये की आजच्या जागतिकीकरणाच्या कालखंडात अनेक 'औपचारिक' उद्योगांमध्ये सुद्धा

'असंघटित' कामगार कामाला ठेवले जातात. किंबहुना या क्षेत्रातील रोजगाराला अधिकाधिक असंघटित स्वरूप येण्याची प्रक्रिया चालू आहे. कँटिन चालवण्यासाठी, कंपन्या व परिसराची साफसफाई, त्यातील बागकाम इत्यादी सेवा पुरवण्यासाठी आज मोठया प्रमाणात कंत्राटी कामगारांचा वापर केला जातो. शाळांमध्ये 'शिक्षणसेवकां' ची किंवा सरकारी योजनांची अमंलबजावणी करण्यासाठी अंगणवाडी अथवा 'आशा' सेविकांची अल्प मानधनावर नेमणूक किंवा बाहेरून काम करून घेण्याची ('आउटसोर्सिंग') पद्धत हे सर्व एका अर्थाने 'असंघटित' मजूरच आहेत. तेव्हा भारतातील असंघटित क्षेत्र किती गुंतागुंतीचे आहे हे लक्षात येईल. महत्त्वाचा मुद्दा असा आहे की, या सर्व कामगारांचे मोठया प्रमाणात विविध प्रकारे शोषण चालू आहे आणि देशातील सर्वात वंचित घटकात ते मोडतात.

हाच उपेक्षित घटक भारताचे ६० टक्के उत्पादन तयार करतो असा अंदाज आहे. आपल्या देशातील एकूण कामकरी जनतेचा विचार केला, तर अंदाजे ९५ टक्के लोक म्हणजे सरासरी ३५–४० कोटी असंघटित कामगार आहेत. देशातल्या स्त्री कामगारंपैकी बहुसंख्य म्हणजे साधारणपणे १२–१४ कोटी असंघटित क्षेत्रात कामाला आहेत. २८–३० कोटी असंघटित कामगार ग्रामीण भागात काम करतात व त्यातले २२ कोटी कामगार शेतीशी निगडित व्यवसायात आहेत. त्यापैकी आठ–नऊ कोटी स्त्रिया आहेत. साधारणतः सात–आठ कोटी कामगार शहरांमध्ये काम करत आहेत. एवढया मोठया संख्येने असणाऱ्या आणि उत्पादनातील मोठा वाटा उचलणाऱ्या या क्षेत्रात काम करणाऱ्यांच्या वाटयाला मात्र प्रचंड दारिद्रय आहे. त्यांची स्थिती सुधारणे म्हणजे देशातल्या राज्यकर्त्या वर्गाची एक घटनात्मक जबाबदारी आहे, असा दृष्टिकोन घेण्याची गरज आहे. तरच त्यांच्या परिस्थितीत काही फरक पडू शकेल.


## संशोधनाचे उद्देश

१. गोंदिया जिल्हयातील असंघटीत भात गिरणी कामगारांच्या आर्थिक समस्यांचे अध्ययन करणे.

## असंघटीत कामगारांच्या आर्थिक समस्या दर्शक सारणी :–

गोंदिया जिल्हयातील असंघटीत भात गिरणी कामगारांच्या आर्थिक समस्यांचे अध्ययन करत असता प्रत्येक असंघटीत भात गिरणी कामगारांच्या कुटुबांवर कर्ज असल्याचे समजले. हे कर्ज त्यांनी कोणकोणत्या कारणांसाठी घेतले? हे अभ्यासने क्रम प्राप्त आहे. कर्जाची कारणे जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता पुढील आकडेवरी प्राप्त झाली.

| अ. क्र. | विवरण | संख्या | प्र. प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | घर बांधणी, दुरूस्ती, खरेदी | २७ | ९% |
| २. | लग्न, बारसे, वाढदिवस,तेरवी, श्राध्द | ३६ | १२% |
| ३. | आजारपण | ४२ | १३.८६% |
| ४. | अन्न व वस्त्रांसाठी | ४० | १३.४३% |
| ५. | व्यापार व व्यवसाय | ४१ | १३.७२% |
| ६. | जुगार, सट्टा, लॉटरी | २३ | ७.७१% |
| ७. | व्यसनां साठी | ३० | ९.८५% |
| ८. | मुलांच्या शिक्षणासाठी | २२ | ७.४३% |
| ९. | इतर कारणांसाठी | ३९ | १३% |
| | एकूण | ३०० | १००% |




वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, घर बांधणी, खरेदी, दुरूस्तीसाठी ९%, मुलांच्या शिक्षणासाठी ७.४३% कर्ज घेणारांचे प्रमाण कमी असून त्या तुलनेत सामाजिक कार्यासाठी १२.००%, कर्ज फेडण्यासाठी व इतर कारणांसाठी १३.१४% कर्ज घेतले. आहे. आजारपणासाठी १३.८६% तर जुगार, लॉटरीसाठी ७.७१%, व्यसनांसाठी ९.८५% या अनावश्यक कारणांसाठी गोंदिया जिल्हयातील असंघटीत भात गिरणी कामगारांनी कर्ज घेतले आहे. मुलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी सुध्दा १३.४३% लोकांना कर्ज घ्यावे लागले आहे. हे विचार करण्यासारखे आहे. व्यापार, व्यवसायासाठी १३% कामगारांनी आर्थिक कर्ज घेतलेले आहे.

## निष्कर्ष

गोंदिया जिल्हयातील असंघटीत भात गिरणी कामगारांच्या आर्थिक समस्याचा अभ्यास करतांना असे आढळून आले की उत्तरदात्यांची स्थिती समाधानकारक असली तरी फारशी चांगली नाही. त्यांच्या राहणीमानाचा दर्जा पाहिजे तितका उंचावलेला नाही त्यांमुळे उत्तरदात्याच्या आर्थिक परिस्थितीचा परिणाम सामाजिक जीवनावर विशेष झाला असे आढळून येते. भात गिरणी कामगारांनी विशिष्ट कारणासाठीच कर्ज घेतात असे नाही. कर्जाची शक्य जेवढी कारणे असू करतात. त्यासर्व कारणांसाठी त्यांनी कर्ज घेतल्याचे दिसून येते. प्रत्येकांच्या समस्या भिन्न भिन्न स्वरूपाच्या आहेत. पण आर्थिक समस्या या सर्वांच्या आहेत.

## संदर्भ सूची

१) अळतेकर ए. एस. 'द पोझिशन ऑफ वुमेन इन हिंदू सिव्हिलायझेशन', नवी दिल्ली, १९६२.
२) अनंतराम शरयू, वडसे उमा – 'भारतीय समाजातील स्त्रियांचे स्थान', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९९७.
३) आंबर्डेकर ना. श., पाटील ज. फा. –'भारतीय कामगार समस्या व कामगार विधान' ,प्रकाशन महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती, विजयनगर, पुणे, १९७९
४) कऱ्हाडे, बी. एम. शास्त्रीय संशोधन पद्धती, पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लीशर, नागपूर, २०११
५) काळदाते सुधा – "औद्योगिक समाजशास्त्र", नाथ प्रकाशन, औरंगाबाद, १९८२
६) गुप्ता पद्मिनीसेन – 'वुमेन्स वर्क्स ऑफ इंडिया' आशिया पब्लिशिंग हाऊस, मुंबई, १९६०

७) नाडगोंडे गुरूनाथ – 'औद्योगिक समाजशास्त्र' कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयनगर, पुणे, ३०, २०००.
८) पाटील, जे. एफ., पठाण, के. जी., ताम्हणकर, पी. जे. व यादव, एस. बी., अर्थशास्त्रीय संशोधनाची तोंड ओळख, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, २०१२
९) फुले सुशीला – 'कामगार स्त्री', संवेदन प्रकाशन, औरंगाबाद, २००२.
१०) बोधनकर, सु., अलोणी, वि. व कुलकर्णी, मृ., सामाजिक संशोधन पध्दती, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, पहिली आवृत्ती १९९३
११) भांडारकर, पु. ल. – सामाजिक संशोधन पद्धती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ,(दत्तराज प्रकाशन), नागपूर, १९७६